**सायबर पोलीस ठाणे, सातारा**
मल्हार पेठ, सातारा
मोबाईल नंबर :- ९५५२९४११५१
ऑफीस नंबर :- ०२१६२- २३३३१७
**Email** - cyberps.satara@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेस नोट दि. २८/०७/२०२२

**सातारा जिल्हयातील गहाळ झालेले अंदाजे १३,००,०००/- रु. किमंतीचे ८२ मोबाईलचा शोध घेवुन मूळ मालकांना परत दिले. सातारा सायबर पोलीस स्टेशनची कामगिरी.**

सातारा जिल्हयातील नागरीकांचे वापरणेत येणारे मोबाईल हे गहाळ होण्याचे प्रमाण वाढले होते. त्याबाबतचा मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल यांनी सायबर पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचेकडुन माहिती घेवुन त्यांना आदेशीत केले की, सायबर पोलीस ठाणे मार्फत गहाळ झालेल्या मोबाईलची तसेच चोरीच्या गुन्हयात गेलेले मोबाईलची तात्रिंक माहितीच्या आधारे शोध मोहिम राबवुन जास्तीत जास्त मोबाईल नागरीकांना परत कसे करता येईल याबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे **अपर पोलीस अधीक्षक श्री. अजित बोऱ्हाडे, पोलीस निरीक्षक सुनिल शेळके, सायबर पोलीस ठाणे सातारा यांनी सायबर पोलीस ठाणेकडील पोलीस अंमलदार अजय जाधव, अमित झेंडे इ. अंमलदार यांचे पथक तयार करुन सातारा जिल्हयातुन गहाळ झालेले मोबाईल शोधकामी नेमणेत आले होते. नमुद पथकांनी मागील एक महिण्यामध्ये तांत्रिक माहिती चे अत्यंत तंत्रशुध्द पध्दतीने विश्लेषण करुन अंदाजे १३,००,०००/- रु. किमंतीचे ८२ मोबाईल शोधुन ते ताब्यात घेणेत सायबर पोलीस पथकास यश आले आहे.**

आज दि.२८/०७/२०२२ रोजी ज्या नागरीकांचे मोबाईल मिळुन आले आहेत. त्या नागरीकांना मोबाईल हे त्यांचेकडील कागदपत्रांची ओळख पटवुन मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक श्री. अजित बोऱ्हाडे, पोलीस निरीक्षक सुनिल शेळके, सायबर पोलीस ठाणे सातारा व सायबर पोलीस ठाणेचे तपास पथकातील सर्व अंमलदार यांचे उपस्थितीत मोबाईल देण्यात आले. नागरीकांना त्याच्या हरवलेला मोबाईल मिळेल असे अपेक्षित नसताना पुन्हा मोबाईल मिळाल्याने नागरीकांनी समाधान व्यक्त केले व तसेच मोबाईल मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसुन आला.

तसेच मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक श्री. अजित बोऱ्हाडे यांनी पथकाचे अभिनंदन करुन भविष्यात देखील सायबरच्या तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे जास्तीत जास्त मोबाईल नागरीकांना परत करण्याबाबत सुचना दिल्या असुन ही मोहीम भविष्यात देखील सतत राबविण्यात येणार आहेत. नमुद कामगिरीत सायबर पोलीस ठाणे सातारा कडील पोलीस निरीक्षक सुनिल शेळके, पोलीस अंमलदार अजय जाधव, अमित झेंडे, महेश शेटे, शंकर सावंत, सचिन पवार, संदिप पाटील, वर्षा खोचे, रेश्मा चव्हाण, यशोमती काकडे, ज्योती शिंदे, प्रविण आहिरे, सुशांत कदम, महेश पवार, यशवंतराव घाडगे यांनी सहभाग घेतला आहे.

पोलीस अधीक्षक साताराकरीता.

**प्रती,**

**सर्व संपादक दैनिक वृतपत्र.**